# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. ०५/०४/२०१७.

**प्रेस नोट**

## मोटार सायकल चोर गुन्हे शाखेच्या जाळयात.

दि.०५/०४/२०१८:- गुन्हे शाखेने मोटारसायकल चोरी करणारा आरोपी नामे शेख मफेजूर रहेमान शेख जैनोद्दीन रा. रोशनगेट यास अटक करून मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आणला.

याबाबत अधिक माहिती देताना गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी कांबळे यांनी सांगितले कि, दि.०४/०४/२०१८ रोजी गुन्हे शाखेचे सफौ/नंदकुमार भंडारी व त्यांचा स्टाफ हे आयुक्तालयामध्ये पेट्रोलिंग करीत असताना जिल्हाधिकारी जवळ एक मोटारसायकल स्वार हा संशयीतरित्या फिरताना आढळून आल्याने त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला असता सदर इसम हा पोलिसांना पाहूण पळू लागला सदर इसमाचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेवून त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शेख मफेजूर रहेमान शेख जैनोद्दीन रा. रोशनगेट असे सांगितले. त्याला त्याच्या ताब्यात असलेल्या मोटारसायकलचे कागदपत्राबाबत विचारपूस करता त्याने सदर गाडीचे कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. त्याला पोलीस स्टेशनला आणून विचारपूस केली असता त्याने सांगितले कि, सदर मोटारसायकल हि जिल्हाधिकारी समोरील दर्गा जवळून चोरी केल्याची कबुली दिली. याबाबत पोलीस स्टेशन अभिलेख तपासाला असता हिरो होंडा मोटारसायकल MH-२०-AJ-३०१४ बाबत पोलीस स्टेशन सिटीचौक येथे गु.र.न ८५/२०१८ कलम ३७९ भा.दवि प्रमाणे गुन्हा दाखल असून आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

हि कामगिरी पोलीस निरीक्षक शिवाजी कांबळे, सफौ/एन.पी.भंडारे, सफौ/साईनाथ महाडिक, पोह/ संजय धुमाळ, फारुख देशमुख, पोकॉ/एस.टी.जाधव, विकास माताडे, एस.इ.भोसले,ओमप्रकाश बनकर यांनी केली

SD/-

(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर